IMPACT FACTOR 5.473(SJIF)
**UPA NATIONAL E-JOURNAL**
*Interdisciplinary Peer-Reviewed Indexed Journal*
ISSN 2455-4375

# ग्रंथालये – भारतीय ज्ञान परंपरेची सदावर्ते

**प्रा. डॉ. धनंजय गभने**
ग्रंथपाल (Asso. grade)
समर्थ महाविद्यालय, लाखनी
Email - dr_gabhane@rediffmail.com
Mob. No. 9423640251

---

**प्रस्तावना :**

ग्रंथालये ही कोणत्याही शिक्षण संस्थेची मध्यवर्ती ज्ञानकेंद्रे आहेत. प्राचीन काळात ग्रंथालये ही कुलुपबंद होती. परंतु कालांतराने ग्रंथालये ही सर्वसामान्य लोकांसाठी खुली झालीत. ग्रंथ व त्यातील ज्ञान स्वत:च्या उत्थानासाठी कामात यावे हा उद्देश यामागे होता. पुढे पुढे ग्रंथालयांचे त्यांच्या उपयोगकर्ता व उपयोगीतेनुसार वर्गीकरण झाले. त्यात प्रामुख्याने शैक्षणिक ग्रंथालये, सार्वजनिक ग्रंथालये व विशेष ग्रंथालये हे प्रकार दिसू लागले.

ग्रंथालयाचे विविध प्रकार जरी असले तरी त्यातील दिल्या जाणाऱ्या सेवामुळे ते उपभोगकर्त्यांच्या उपयोगी नक्कीच पडत आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या या युगातही पारंपारीक सेवा आपले महत्व टिकवून आहेत.

बदलत्या शैक्षणिक धोरणानुसार (NEP २०२०) भारतीय ज्ञानपरंपरेचा विद्यार्थ्यांना उपयोग व्हावा व ओळख व्हावी व त्यातून भारतीय संस्कृतीविषयी अधिक जिव्हाळा निर्माण व्हावा या हेतूने अभ्यासक्रमात समाविष्ट केले आहे.

हे सर्व करत असतांना ग्रंथालये व त्यातून दिल्या जाणाऱ्या सेवांचे महत्वही वाढले आहे.

सदर लेखात लेखकाने ग्रंथालये, त्यांचे विविध प्रकार व वैशिष्टये, शैक्षणिक धोरण २०२० भारतीय ज्ञान परंपरा व तिचे वैशिष्टये इ. वर सखोल विवेचन केले आहे.

**प्रस्तावना :**

ग्रंथालये ही कोणत्याही शैक्षणिक संस्थेचा मध्यवर्ती ज्ञानकेंद्र समजली जातात. त्यांचे स्थान हे दुय्यम मानून चालणार नाही. शैक्षणिक ग्रंथालये, सार्वजनिक ग्रंथालये, विशेष ग्रंथालये असे विविध प्रकार काही ग्रंथालयाचे असले तरी ग्रंथ व वाचक यांचा परस्पर संबंध व पुरकता कधीच दुर्लक्षीत करता येणार नाही. कालउदय ग्रंथालयांच्या सेवेतही आमुलाग्र बदल झालेला आहे. पारंपारीक सेवा देत असतांनाच ग्रंथालये आधुनिक सेवा अधिकाधिक कशा चांगल्या देता येतील यांचा प्रयत्न नेहमीच करीत असतात. ग्रंथालये ही ज्ञानाची सदावर्ते आहेत असे म्हटले जाते, आणि ते खरेही आहे, कारण आजच्या बदलत्या युगात जिथे माहिती तंत्रज्ञानानी सर्वच क्षेत्र काबीज केले आहे, तेथे ग्रंथालयाच्या सेवाही प्रभावित झालेल्या आहेत. अशातच भारत सरकारने असेच एक महत्वाचे पाऊल उचलले आहे. ते म्हणजे नविन शैक्षणिक धोरण

२०२० याचा अंगिकार करणे होय. शालेय शिक्षणापासून तर उच्च शिक्षणापर्यंत नविन शैक्षणिक धोरण २०२० अवलंबिलेला आहे. यात मुख्यत्वे भारतीय ज्ञानसंवाद या पैलूवर अधिक भर दिला आहे. भारतीय ज्ञानपरंपरेची ओळख व्हावी, त्याचे ज्ञान वाढावे व विद्यार्थ्यांमध्ये भारतीय संस्कृती व ज्ञानपरंपरा या पैलूवर अधिकाधिक भर दिला आहे. भारतीय ज्ञान परंपरेची ओळख व्हावी व ज्ञान वाढावे व विद्यार्थ्यांमध्ये भारतीय संस्कृती व ज्ञान परंपरा याबद्दल जवळीकता निर्माण व्हावी हा या मागील उद्देश असावा. ग्रंथालये हे शैक्षणिक संस्थेच्या आत्मा असल्यामुळे ते हे सर्व काम उत्तमरित्या बजावू शकतात यात शंकाच नाही.

**ग्रंथालयाचे प्रकार :**

प्रामुख्याने ग्रंथालयाचे तीन प्रकार पडतात.

१) सार्वजनिक ग्रंथालये

२) शैक्षणिक ग्रंथालये

३) विशेष ग्रंथालये

सार्वजनिक ग्रंथालये ही सर्व जनतेसाठी खुली असतात. शहरी व ग्रामिण भागात सार्वजनिक ग्रंथालयांची संख्या भरपूर आहे. त्यातील ग्रंथालयाचे अ, ब, क, ड असे वर्गीकरण करण्यात आले.

शैक्षणिक ग्रंथालये ही शिक्षण ग्रंथालये रूपात असतात. ही ग्रंथालये सर्व जनतेसाठी खुली नसतात. यामध्ये विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी हे उपयोगकर्ते असतात.

विशेष ग्रंथालये ही सुध्दा संशोधन क्षेत्रात कार्यरत असलेल्या संस्थांशी निगडीत असतात. यामध्ये उपयोगकर्ता हा मुख्यत्वे संशोधक वर्गात मोडतो. संशोधन क्षेत्रात कार्य करणारे संशोधक, विद्यार्थी व अन्य जिज्ञासू व गरजू वाचक या ग्रंथालयांचा उपयोग करतात.

**ग्रंथालये व नविन शैक्षणिक धोरण २०२० :**

भारत सरकारने नविन शैक्षणिक धोरण २०२० आखले व ते देशातील सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये राबविले जात आहे. या धोरणानुसार शालेय अभ्यासक्रमातून तर उच्च शिक्षणापर्यंत आमुलाग्र बदल झाले आहेत. यात ग्रंथालयांची ही भूमिका महत्वाची ठरत आहे. आधुनिक तंत्रज्ञानामुळे ग्रंथालयाच्या सेवांमध्येही सकारात्मक बाब ठरविण्यात आल्या आहेत. ही काळाची गरज आहे व त्यामुळे विद्यार्थ्यांना नवनविन माहिती मिळून ते नविन शैक्षणिक धोरणांमध्ये ग्रंथालयाची भूमिका सुध्दा फारच महत्वाची आहे. ग्रंथालयांच्या बाबतीत या धोरणामध्ये खालील काही महत्वाच्या मुद्यांचा उल्लेख आहे.

१) वाचन संस्कृती प्रोत्साहन देवून त्या अनुषंगाने जास्तीत जास्त ग्रंथ वाचकांसाठी भारतीय भाषांमध्ये उपलब्ध करून देणे.

२) सार्वजनिक ग्रंथालयांना अधिकाधिक कार्याभिमुख बनवून ती ज्ञान प्रसाराची केंद्र बनविणे.

३) शैक्षणिक ग्रंथालयांचे आधुनिकीकरण करणे.

४) ग्रंथालयांना अधिकाधिक सक्षम बनविणे.

५) ज्ञानस्त्रोत सर्व वाचकांपर्यंत पोहचविणे.

६) ग्रंथालयातील कर्मचारी वर्ग यांना प्रशिक्षित करून त्यांना आधुनिक तंत्रज्ञानाशी अवगत करणे इ.
७) अंकिय ग्रंथालयांना प्रोत्साहन देणे.
८) ग्रंथालयाद्वारे विद्यार्थ्यांचे सार्वजनिक हित साधणे.

वरील मुद्यांवरून हे लक्षात येते की, नविन शैक्षणिक धोरणामध्ये ग्रंथालय, त्यातील सेवा सुविधा, कर्मचारी अधिकाधिक सक्षम व्हाव्यात या दृष्टीने सकारात्मक विचार केला आहे.

याच बरोबर भारतीय ज्ञान परंपरेचा अभ्यासही नविन शैक्षणिक धोरणामध्ये अवलंबलेला आहे.

**भारतीय ज्ञानपरंपरा म्हणजे काय?**

भारताचा प्राचीन इतिहास काळात आपण डोकावून पाहिले तर देशाला अतिशय प्राचीन संस्कृती लाभलेली आहे. यामध्ये वेद, उपनिषदे , पुराणे, महाकाव्ये यांचा अभ्यास त्या संबंधीत धर्म, संकल्पना चालीरिती इ. चा अभ्यास आढळतो. प्राचीन काळात या देशाचा परदेशातून अनेक जिज्ञासू अभ्यासकांनी भेटी दिल्या व येथील संस्कृतीचा अभ्यास केला आहे, असे आपल्याला इतिहासात वाचावयास मिळते अर्थात भारतीय संस्कृतीतील ही ज्ञानपरंपरा अतिशय समृध्द आहे. या ज्ञानपरंपरेचा अभ्यास विद्यार्थ्यांना व्हावा, त्यामुळे आपल्या संस्कृतीविषयी अधिक आस्था निर्माण व्हावी व पर्यायाने त्यांचे ज्ञान वृध्दींगत होवून व्यक्तिमत्व विकास व्हावा या दृष्टीकोनातून याचा नविन शैक्षणिक धोरणात अंतर्भाव केला आहे.

**भारतीय ज्ञान परंपरेची वैशिष्टये :**

भारतीय ज्ञानपरंपरा ही तत्वज्ञान, खगोलशास्त्र, गणित, वैद्यकशास्त्र, कला यासारख्या क्षेत्रात पसरलेली प्राचीन व विशाल ज्ञान परंपरा आहे.

भारतीय ज्ञानपरंपरा ही मानवी जीवनाच्या सर्वच पैलूंवर व परस्पर संबंधावर भर देते. अर्थात ती समग्र दृष्टिकोन असलेली ज्ञानपरंपरा आहे.

भारतीय ज्ञानपरंपरेचा पाया आध्यात्मावर आधारीत आहे व त्याच बरोबर ती आत्म साक्षात्कार व सत्याचा शोध या संकल्पनांवर भरते.

भारतीय ज्ञान परंपरेचे स्वरूप हे आंतर विद्या शाखीय आहे. ती निसर्गाचा आदर करणारी आहे अर्थात मानवी जीवन व पर्यावरण याचा प्रकर्षाने विचार करणारी आहे.

भारतीय ज्ञान परंपरेमध्ये गुरू–शिष्य अर्थात शिक्षक–विद्यार्थी याद्वारे ज्ञानाचे प्रयत्न केले जाते आणि याला प्राचीन परंपरेचा आधार आहे. यामध्ये वेद उपनिषद आणि पुराणे या सारख्या प्राचीन ग्रंथांचे जतन केले आहे. यात मौखिक ज्ञानप्रवाहाला खूप महत्व दिले आहे.

भारतीय ज्ञानपरंपरा ही आध्यात्मिक पायावर जरी आधारीत असली तरी ती प्रत्यक्ष अनुभवजन्य निरीक्षणावर भर देणारी आहे व त्यातूनच वैज्ञानिक प्रगती साधणारी आहे. याच बरोबर भारतीय ज्ञान परंपरेत विज्ञान वर्गशिक्षक, आरोग्य व औषध शास्त्र, कला आणि संस्कृती, शेती आणि पर्यावरण, शासन आणि

राजकारण या क्षेत्रात भारतीय ज्ञानपरंपरेच्या अतिशय अतिशय मोलाचा व महत्वाचा वाटा आहे. भारतीय ज्ञानपरंपरा आधुनिक आव्हानांना तोंड देण्यासाठी सक्षम आहे. शाश्वत विकास, अनावश्यक पारंपारीकता कमी करणे, नैतिक मुल्यांचे जतन, सामुदायीक मुल्यमापनावर भर देणे.

वरील विवेचनावरून असे लक्षात येते भारतीय ज्ञानपरंपरा ही किती समृध्द आणि सक्षम आहे.

**भारतीय ज्ञान परंपरा आणि ग्रंथालये :**

ग्रंथालये ही आता गोदामे नसून ती ज्ञानप्रसारणाची केंद्र झाली आहेत. पारंपारिक सेवांची कात टाकून ती आता आधुनिक तंत्रज्ञानानी समृध्द झाली आहेत. ग्रंथालये कोणत्याही प्रकारचे असले तरी त्यात ते विविध विषयांशी संबंधित, वाचकांची रूची ओळखून विविध ज्ञान स्तोत्राचा संग्रह करणे ही काळाची गरज आहे. मग ते विज्ञान असो, कला वा अन्य तंत्रज्ञान, तत्वज्ञान या सारख्या विविध विषयांवर असलेल्या ज्ञानस्त्रोतांचा संग्रह त्यात असणे हे वाचकांच्या आवडी व गरजा पूर्ण करण्यास सक्षम ठरते.

सध्या नविन शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत भारतीय ज्ञान परंपरेचा अभ्यास अंतर्भूत केला आहे. यामध्ये ग्रंथालयाची भूमिका महत्वाची ठरते. कारण ग्रंथालये हे ज्ञानाचे रक्षक आहेत. ग्रंथालयात उपलब्ध असलेली विविध विषयांवर ग्रंथ वाचकांना उपलब्ध करून देणे, त्यांची आवड व रूची संतुष्ट करणे या सारखी महत्वाची भूमिका ग्रंथालये बजावतात.

ग्रंथालयामध्ये प्राचीन हस्तलिखिते, सांस्कृतिक चालीरीती सांगणारी ग्रंथे व अन्य महत्वाचे दस्तावेज उपलब्ध असली तर त्यातून वाचकांना महत्वाची व अमूल्य माहिती प्राप्त होते.

ग्रंथालयात उपलब्ध असलेल्या पारंपारीक माहितीचे व्यक्तीगत पध्दतीने अंकीकरण (Digitization) ते जतन करणे व योग्य त्या वाचकापर्यंत पुरविले जावू शकतात.

ग्रंथालये ही ज्ञानस्त्रोताचे व पर्यायाने ज्ञानाचे रक्षक म्हणून कार्य करतात. यामुळे आपल्या देशाचा बौध्दीक वारसा जतन करण्यात ग्रंथालये महत्वाची भूमिका बजावतात.

ग्रंथालयात उपलब्ध असलेली हस्तलिखिते वाचकांना त्यांच्या संशोधन कार्यात मदत करण्यास मोलाची भूमिका पार पाडतात. यामुळे संशोधन व शैक्षणिक कार्यात मदत मिळते. ग्रंथालयात भारतीय ज्ञान परंपरेच्या अनुषंगाने उपलब्ध असलेली माहितीचे व्यवस्थितपणे रखरखाव केले असतांनी भविष्यातील अनेक पिढयांना  मार्गदर्शक ठरू शकते.

**निष्कर्ष :**

वरील सर्व विवेचनावरून असा निष्कर्ष काढता येईल की,

१) ग्रंथालये ही आता केवळ ग्रंथ साठविणारी गोदामे राहिलेली नसून ती ज्ञान परंपरेची केंद्र झाली आहेत.

२) नविन शैक्षणिक धोरणात ग्रंथालयाची भूमिका महत्वाची आहे.

३) भारतीय ज्ञान परंपरेचा प्रसार करणे, त्यायोगे प्राचीन ज्ञान वाचकांपर्यंत पोहचविणे व पर्यायाने देशातील प्रत्येक नागरीकांची वैचारीक पातळी बदलविणे, व्यक्तिमत्वाचा विकासास हात बळकावणे. महत्वचाचा भूमिका पार पाडण्याची ग्रंथालये ही मैलाचा दगड ठरत आहेत.

४) वरील शैक्षणिक धोरण २०२० व भारतीय ज्ञानपरंपरा या दोन्ही महत्वाच्या बाबींची अंमलबजावणी करण्यासाठी ग्रंथालये फारच महत्वाची ठरतात. या अर्थी ग्रंथालये ज्ञानाची सदावर्ते आहेत.

**संदर्भ :**


- Asif Mohammad, Singh K.K. Libraries @ National Education Policy (NEP 2020) in India. IP Journals Library Science and Information Technology 2022, 7(1) : P : 18-21.
- Das Rajib Kumar, Kalita Khagen, Singha Anuradha, The Role of Libraries Indian Knowledge Systems for Technology enhanced teacher education – EPRA International Journal of Multidisciplinary Research (IJMR) – Volume 11 (Issue:3) March 2025.
- टेंभेकर आशीष, 'भारतीय ज्ञानपरंपरा', पिंपळापुरे अॅन्ड कं. पब्लिशर्स, नागपूर २०२४.
- टेंभेकर आशीष, 'भारतीय सांस्कृतिक वारसा', पिंपळापुरे अॅन्ड पब्लिशर्स, नागपूर २०२४.